पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - ९०७ दिनांक - ३०/१२/२०२३

सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

### पीएमटी बसमध्ये प्रवास करणा-या वृध्द नागरीकांना व महिलांना हेरुन त्यांचे सोन्याचे दागीने, मोबाईल, पर्स चोरणा-या सराईत आरोपीस केली शिताफीने अटक

फिर्यादी हया दि.२८/१२/२०२३ रोजी पुणे सातारा रोडवरील पद्मावती बसस्टॉप ते बालाजीनगर असा पीएमटी बसमध्ये बसुन प्रवास करीत असताना आहिल्यादेवी चौकात त्यांचे हातातील **२ तोळे वजनाची ४०,०००/- रुपये** कि.ची सोन्याची बांगडी लोखंडी कटरच्या सहाय्याने जबरदस्तीने तोडुन चोरी करुन पळुन जाणारा पीएमटी बसमध्ये चोऱ्या करणारा **मुळचा उत्तर प्रदेश येथील रहिवाशी असलेला व सध्या कोंढवा भागात राहणारा सराईत गुन्हेगार १) चांदबाबु अलीहुसेन शेख वय ३० वर्षे रा.स.नं.४२, बेचाळीस चौक अलीभाई लेडीज टेलर मागे, कोंढवा खुर्द पुणे. मुळ रा.गाव गौरव काला पोष्ट महमदपुर ता.कैरनलगड जि.गोंडा राज्य उत्तर प्रदेश** यास गस्तीवर असलेले **पोलीस अंमलदार सुशांत फरांदे व महेश मंडलीक** यांनी पाठलाग करुन छत्रपती मंगलकार्यासमोर पकडुन सहकारनगर पोलीस स्टेशन येथे आणले. त्याचे फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.३५६/२०२३ भा.द.वि कलम ३९२ अन्वये गुन्हा नोंद आहे.

दाखल गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुरेंद्र माळाळे सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.संदीप देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी पोलीस उप-निरीक्षक राहुल खंडाळे व तपास पथकाचे स्टाफने सुरु केला. आरोपी नामे चांदबाबु शेख याचे अंगझडतीमध्ये त्याने फिर्यादी यांची जबरदस्तीने चोरलेली ४०,०००/-रुपये कि.ची सोन्याची बांगडी व एक १००/- रुपये किमतीचे लोंखंडी कटर जप्त केले आहे.त्याची पोलीस कस्टडीची रिमांड घेवुन त्याचेकडे अधिक तपास करता त्याने दोन ते आडीच महिन्यापुर्वी एक महिलेची पीएमटी बसमध्ये बालाजीनगर येथे पर्स चोरुन त्यामधील २५,०००/- रुपये किमतीचे अर्ध्या तोळयाचे कानातील टॉप्स व २०००/-रुपये चोरल्याची माहिती दिली. त्यावरुन तपास करता सदर बाबत सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२६८/२०२३ भादवी कलम ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद असुन त्याचे कोंढवा येथील राहते घरातुन २५,०००/-रुपये किमतीचे अर्ध्या तोळयाचे कानातील टॉप्स जप्त करण्यात आले आहेत. नमुद आरोपीस पकडुन सहकारनगर पोलीस स्टेशनकडील १) सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२६८/२०२३ भादवी कलम ३७९ प्रमाणे व २) सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३५६/२०२३ भादवी कलम ३९२ प्रमाणे हे दोन गुन्हे उघडकीस आणुन ६५,०००/-रुपये किमतीचे सोन्याचे दागीने जप्त केले आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री.प्रवीणकुमार पाटील मा.पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग श्री.नारायण शिरगावकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहकारनगर पोलीस स्टेशन श्री.सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संदीप देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक बापु खुटवड, पोलीस अंमलदार सुशांत फरांदे, महेश मंडलिक, बजरंग पवार, नवनाथ शिंदे, अमोल पवार, निलेश शिवतरे, भुजंग इंगळे, सागर सुतकर, सागर कुंभार, विशाल वाघ यांनी केली आहे.

**तसेच पोलीसांमार्फत महिला व वृध्द नागरीक यांना आवाहन करण्यात येते की, सार्वजनीक बसमधुन प्रवास करताना सतर्कता बाळगुन काहीही संशयास्पद प्रकार आढळुन आल्यास पोलीस कंट्रोल रुम नंबर ११२ अथवा महिला हेल्पलाईन नंबर १०९१ यावर तात्काळ मदतीसाठी संपर्क साधावा.**


फोन : ०२०-२४२२८११३ / २४२२६६०४
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
सहकारनगर पोलिस ठाणे
पुणे शहर

